UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume-10 : Issue-1 (January-2024)
ISSN 2455-4375

# ग्रंथालय, ग्रंथपाल व नविन शैक्षणिक धोरण – एक भविष्यवेध

**प्रा.डॉ.धनंजय गभने**
समर्थ महाविद्यालय लाखनी जि.भंडारा.
मो.नं.९४२३६४०२५१
Email Id - dr_gabhane@rediffmail.com

---

**सारांश :**

भारताला लाभलेली समृद्ध परंपरा व ऐतिहासीक वारसा आपणा सर्वांना ज्ञात आहे. प्राचीन संस्कृती व तत्वज्ञान पासून तर आजच्या माहिती तंत्रज्ञानापर्यंत सर्वच क्षेत्रात आपला भारत ऐश अग्रेसर आहे आणि सतत एक एक पाऊल पुढेच जात आहे. सध्या देशात सुरू असलेल्या सर्वच क्षेत्रातील होणारी प्रगती नेत्रदिपक आहे. याचबरोबर शिक्षण क्षेत्रात ही अमुलाग्र बदल होत आहे. मग त्यात शालेय शिक्षणापासून तर अगदी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, त्यांची कार्यप्रणाली संबंधीत घटक यांचेही योगदान महत्वाचे ठरते.

शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर, शैक्षणिक संस्थांची ग्रंथालये ही ज्ञानाची सदावर्ते आहेत. त्याचबरोबर समाजासाठी सार्वजनिक ग्रंथालये सुद्धा ज्ञान प्रबोधनाची केंद्रे आहेत. त्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. भारत सरकारने शिक्षण क्षेत्रात बदल घडविण्याच्या दृष्टिकोनातून नुकतेच नविन शैक्षणिक धोरण–२०२० जाहीर केले व त्याची अमंलबजावणी सुद्धा सुरू झालेली आहे.

प्रस्तुत शोध निबंधात लेखकाने ग्रंथालय, त्याची विविध प्रकार, कार्य व महत्व, ग्रंथपालाची भूमिका, नविन शैक्षणिक धोरण २०२० ची वैशिष्टये व त्या अनुषंगाने ग्रंथालय व ग्रंथपाल यांची जवाबदारी यांची सांगड घालून उहापोह केलेला आहे.

---

**प्रस्तावना :**

शिक्षणाचे बदलते प्रवाह, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात त्याची आवश्यकता व त्यानुसार नविन शैक्षणिक धोरण २०२० ची आवश्यकता व अंमलबजावणी या सर्व बाजूंनी विचार केला तर ग्रंथालयाची भूमिका सुध्दा अन्य घटकापेक्षा कमी महत्वाची नाही असे म्हणायला काही हरकत नाही.

नविन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये ग्रंथालयाच्या बाबतीत, त्यांच्या बदलत्या स्वरूपाबाबत, सेवासुविधा बाबतही बराच उहापोह निदर्शनास येतो. हे सर्व समजून ठेवण्यासाठी सर्वप्रथम आपण ग्रंथालय या घटकातून सुरूवात करूया.

**ग्रंथालये म्हणजे काय :**

ग्रंथालये म्हणजे ज्या ठिकाणी मुद्रीत व अमुद्रीत स्वरूपातील लेखन, ग्रंथ हे एक विशिष्ट पध्दतीने व्यवस्थितमध्ये संग्रहीत केलेले ठिकाण अशी साधी सरळ सोपी व्याख्या आपण करू शकतो. अगदी शास्त्रशुध्द पध्दतीने बोलायचे झाल्यास ग्रंथालय म्हणजे ज्या ठिकाणी माहिती व ज्ञानाची स्त्रोते मागणी नुसार वाचकाला पुरविण्यासाठी संग्रहीत करण्याची जागा होय, असे म्हटले तरी जे वावगे ठरत नाही. साधारणपणे ग्रंथालयाचे तिन प्रकार पडतात. एक म्हणजे शैक्षणिक ग्रंथालय, दुसरे ते सार्वजनिक ग्रंथालय आणि तिसरा प्रकार तो विशेष ग्रंथालय.

शाळा, महाविद्यालय व विद्यापीठा अंतर्गत येणारी ग्रंथालये ही शैक्षणिक ग्रंथालये या प्रकारात मोडतात. समाजासाठी, समाजातील सर्व स्तरावरील लोकांसाठी चालविली जाणारी ग्रंथालये म्हणजे सार्वजनिक ग्रंथालये होत; तर संशोधन संस्था, इस्पितळे या सारख्या संस्था अंतर्गत कार्य करणारी ग्रंथालये म्हणजे विशेष ग्रंथालये होत. या सर्व प्रकारच्या ग्रंथालयाची कार्यपध्दती, त्या अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा यामध्येही फरक आढळून येतो, पण तरीसुध्दा ही सर्व ग्रंथालये उपयोगकर्ताच्या

गरजेनुसार, आवडीनुसारच सेवा देतात, किंबहुना ते आवश्यकच असते.

या सर्वच प्रकारच्या ग्रंथालयात कार्य करणारी कर्मचारी यंत्रणा मग, ग्रंथालय असेल, सहाय्यक कर्मचारी वर्ग असेल, सर्वांनाही वाचकांना सेवा देतांना, वाचकांचे समाधान पातळीच्या विचार लक्षात घेऊनच कार्य करावे लागते. यात ग्रंथालयाची भूमिका तर फारच महत्वाची व जवाबदारीची ठरते.

**ग्रंथपाल — भूमिका व जबाबदारी :**

ग्रंथपाल हे पद आता शिक्षक संवर्गात मोडत असल्यामुळे त्यास आपण फक्त शिक्षक म्हणूनही चालणार नाही. पूर्वीच्या काळी ग्रंथालयाचे स्थान म्हणजे केवळ ग्रंथागारात बसून तेथील ग्रंथसाहित्याचा ठेवा सांभाळावे व एखाद्या काळजीवाहू कर्मचारी (Caretaker) म्हणून काम करणे असेच होते. पण आता ती परिस्थिती अजिबात नाही. जसे वर म्हटल्याप्रमाणे त्याला केवळ शिक्षक एवढे म्हणून चालणार नाही, कारण ग्रंथालयाच्या बदलत्या स्वरूपामुळे, सतत होणाऱ्या माहिती तंत्रज्ञान बदलामुळे ग्रंथालयात ग्रंथालयाच्या सेवा व सुविधा प्रदान करतांना फारच दक्ष व तत्पर राहावे लागते. ग्रंथालयाच्या प्रत्येक उपयोगकर्त्यास त्याच्या आवश्यकतेनुसार, रूचीनुसार ग्रंथालय सेवा प्रदान करावी लागते. किंबहुना उपयोगकर्त्यास ग्रंथालय सेवा, हवी असलेली माहिती शोधण्यात मार्गदर्शन व मदत सुध्दा करावी लागते. शैक्षणिक ग्रंथालयातील ग्रंथालयात तर शिक्षकासाठी त्याला मार्गदर्शक म्हणून राहावे लागते. म्हणूनच तो केवळ शिक्षक नसून **''शिक्षकांचा शिक्षक''** आहे असे म्हणावयास हरकत नाही. ही भूमिका कमी जास्त प्रमाणात अन्य प्रकारच्या ग्रंथालयात कार्य करणाऱ्या ग्रंथपालांनाही लागू पडते. ही जबाबदारी सक्षमतेने पार पाडण्यासाठी ग्रंथपालांच्या अंगी काही गुणविशेष असणेही गरजेचे आहे वा ते असायलाही पाहिजे.

**नेतृत्व गुण व निर्णय क्षमता :**

ग्रंथपाल हा ग्रंथालयाचा नेतेपण सिध्द करणारा असावा. नेतृत्व गुण व निर्णय क्षमता त्याच्या अंगी असायला पाहिजे. जेणेकरून ग्रंथालयाच्या सेवा उत्कृष्टपणे वाचकांपर्यंत पोहचविण्यात त्याद्वारे मदत मिळते.

**वेळेचे व्यवस्थापन — समयसुचकता :**

ग्रंथालयाच्या पाच नियमांपैकी एक महत्वाचा नियम म्हणजे वाचकांचा वेळ वाचला पाहिजे. ग्रंथालयाच्या सेवा देतांना कमीत कमी वेळात त्या सेवा उपयोगकर्त्यास कशा देता येतील अशा पध्दतीने नियोजन असणे आवश्यक आहे.

**अद्यावतपणा :**

ग्रंथालयामध्ये सतत अद्यावतपणा आणण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून अद्यावत सेवा वाचकांपर्यंत पोहचविणे हे ग्रंथपालाचे कर्तव्यच ठरते.

**संवाद कौशल्य :**

वाचकांशी उत्तमसंवाद साधणे सुध्दा ही कलाच आहे. हे संवाद कौशल्य ग्रंथपालाच्या अंगी असणे आवश्यक आहे. यामुळे अधिकाधिक वाचक ग्रंथालयाकडे आकृष्ट होण्यास मदत होते.

**नविन नविन संकल्पनांचा वापर :**

पारंपारिक ग्रंथालयीन सेवा हया आता कालबाहय झाल्या आहेत. ग्रंथपाल हा कोणत्याही प्रकारचा ग्रंथालयात कार्य करीत असला तरी तो ग्रंथालय सेवा देतांना आपले वेगळे कौशल्य वापरून नवनविन कल्पना योजून त्यात पुन्हा नाविण्य निर्माण केले तर वाचनसंस्कृती वृध्दींगत होण्यास

आपसूकच हातभार लागतो.

याच बरोबर लेखन कौशल्य, भाषा कौशल्य, संशोधनवृत्ती वाचनकर्त्याचे निराकरण यासारख्या कौशल्यांचा वापर करून ग्रंथालय सेवा अधिकाधिक सक्षम करता येतील. शैक्षणिक संस्थांच्या नॅक संस्था बंगलोर या संस्थेद्वारे मुल्यांकन प्रक्रियेत सात निष्कर्षांच्या चाचणीतही ग्रंथालयाची व ग्रंथपालाची भूमिका महत्वाची आहेच. सार्वजनिक ग्रंथालयाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास ही ग्रंथालये समाजातील प्रत्येक स्तरातील घटकांसाठी माहिती व ज्ञानाची कवाडे खुली करणारी, समाजप्रबोधन करणारी रोजगाराभिमुख माहिती प्रदान करणारी, शेती व शेतीपुरक व्यवसायाची माहिती व ज्ञान देणारी व सोबतच फावल्या वेळेचा मनोरंजनासाठी उपयोग करून त्यातूनच ज्ञानरंजन करणारी महत्वाची केंद्रे आहेत. यामध्ये कार्य करणारी ग्रंथालय कर्मचारी ज्ञानस्त्रोते व वाचक यांना जुडणारी महत्वाची दुवे आहेत. विशेष ग्रंथालयात कार्य करणारा ग्रंथपालावर तर एका अर्थाने फार जोखिम असते, कारण या ग्रंथालयाची सेवा घेणारी वाचकांना हवी असलेली माहिती मुख्यत्वे संशोधनासाठी, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, राष्ट्रीय दृष्टीने महत्वाच्या कामासाठी उपयोगी असल्यामुळे ती अचूक व अद्यावत असायला हवी.

वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की, ग्रंथालये व ग्रंथपाल याचे अतूट नाते असून ही दोन्ही घटके उपयोगकर्त्याच्या मागणीनुसार सक्षम व अद्यावतअसणे फारच गरजेचे आहे. ग्रंथालये ही शिक्षक व समाज व त्यातून घडणाऱ्या पिढीसाठी अमृतच आहेत. हे अमृत नेहमीसाठी संजीवन राहावीत याकरीता त्यांचे संतृप्तीकरण व संवर्धन करणे ही काळाची गरजच आहे. हे साध्य करण्याच्या दृष्टीकोणातून देशाची शिक्षण प्रणाली सुध्दा तितकीच सुदृढ व सक्षम असणे गरजेचे आहे. नुकतेच सरकारने नविन शैक्षणिक धोरण २०२० जाहीर केले व त्याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या धोरणात समग्र विकास (Holistic development) हा केंद्रबिंदू मानून त्या अनुषंगाने विकासाला कारणीभूत अन्य सर्व घटकांचा विचार करण्यात आलेला आहे. त्यात ग्रंथालयाच्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात विचार करून मार्गदर्शक तत्वे मांडण्यात आली आहेत.

प्रथम आपण हे सर्व नविन शैक्षणिक धोरण २०२० ग्रंथालया बाबतीत प्रमुख वैशिष्टये जाणुन घेऊ या.

**यात प्रामुख्याने :**

- उत्तमोत्तम वाचन साहित्य निर्मितीवर भर देण्यात यावा.
- अंकीय ग्रंथालयाची (Digital Libraries) ची निर्मिती करण्यात यावी.
- वाचन संस्कृती अधिकाधिक वृध्दींगत व्हावी या दृष्टीने प्रयत्न असावेत.
- सर्व भारतीय भाषेतून ग्रंथांची निर्मिती होण्यावर भर देण्यात यावा.
- ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे.
- ग्रंथालयात उत्तमोत्तम ग्रंथसाठा असावा.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रंथालयाच्या सेवामध्ये अधिकाधिक वापर करण्यात यावे. जेणेकरून त्या अधिक सक्षम होतील.

या वैशिष्टया व्यतिरीक्त शिक्षण प्रणाली परिवर्तनासाठी या नविन शैक्षणिक धोरणात अंतर्भूत केली आहेत.

नविन शैक्षणिक २०२० च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्रंथपाल व ग्रंथालय यांच्या खारीचा का असेना पण महत्वाचा वाटा आहे. कारण ग्रंथालय ही शिक्षण संस्थाची अविभाज्य अंगे आहेत. हिच बाब सार्वजनिक ग्रंथालये व विशेष ग्रंथालये यांनाही समतोलपणे लागू पडतात.

**निष्कर्ष :**

वरील सर्व विवेचनातून असे लक्षात येते की, ग्रंथालय मग ती कोणत्याही प्रकारची असेल परंतु वर सांगितल्याप्रमाणे ग्रंथपालाचे कार्य कौशल्यपूर्ण असेल तर नविन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यास ग्रंथालयाचे योगदान महत्वपूर्ण ठरू शकते व भविष्यात एक सक्षम शिक्षणव्यवस्थेद्वारे समाजाचा समग्र विकास साधला जाईल यात शंका नाही.

**संदर्भसूची :**


- Asif M. Singh K.K. - Libraries@National Education Policy (NEP 2020) in India IP Indian J. Libr Sci Inf School 2022; 7(1) : 18-21
- NEP 2020, Ministry of Human Resource Development Govt. of India.
- गभने, धनंजय — शैक्षणिक ग्रंथालये आणि नविन शैक्षणिक धोरण — २०२०
- *Vidyawarta* Issue - 46 Vol. 04 (April-June 2003)
- Rokade Shashikant, Gabhane D.R. - A Pathway to Professional Excellence in LIS (Library and Information Science) IJRSSI - Vol.II Issue (4) 2015 P.129-131.